महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॅन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९,

---

क्र.महानिर्मिती/स.म.व्य.(से.प्र./मासं)/10774 दिनांक: 18 NOV 2022

## सूचना

**विषय**:- "सहाय्यक कल्याण अधिकारी"(Assistant Welfare Officer) या पदाच्या ऑनलाईन परीक्षेअंती वैयक्तिक मुलाखतीबाबत.

**संदर्भ**:- १) महानिर्मिती जाहिरात क्र.०८/२०२१
२) महानिर्मिती सूचना क्र.६००८ दि.०८.०७.२०२२
३) महानिर्मिती सूचना क्र.७६७१ दि.२२.०८.२०२२

---

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०८/२०२१ अन्वये "सहाय्यक कल्याण अधिकारी"(Assistant Welfare Officer) या पदाची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तदनंतर सदरील जाहिरातीकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांनी अर्जासोबत जोडलेले कागदपत्रे /दस्तऐवजानुसार पात्र उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा दि.१०.०९.२०२२ रोजी पार पाडण्यात आली आहे.

वरील नमूद पदाकरीता १:३ या प्रमाणात वैयक्तिक मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी सोबत जोडली आहे. वरील मुलाखतीकरीता उपस्थित राहण्याचे ठिकाण व वेळ खालीलप्रमाणे :-

**ठिकाण** :- महानिर्मिती कंपनी, प्रकाशगड, २ रा मजला, प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
**दिनांक** :- २५/११/२०२२
**वेळ** :- सकाळी ११.०० वाजता.

वैयक्तिक मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी खालील नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून तयार करण्यात आली आहे :-

१) उमेदवारांना वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता बोलविण्याची पात्रता ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण इत्यादी बाबतची मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात सिध्द न करु शकल्यास त्यांची उमेदवारी / निवड रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) "सहाय्यक कल्याण अधिकारी"(Assistant Welfare Officer)" या पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

३) केवळ वैयक्तिक मुलाखतीच्या यादीत नाव आहे, म्हणून अंतिम निवड यादीत निवड करावी असा दावा उमेदवार करु शकणार नाही.

४) "सहाय्यक कल्याण अधिकारी"(Assistant Welfare Officer)" या पदाच्या वैयक्तिक मुलाखत प्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

५) "सहाय्यक कल्याण अधिकारी"(Assistant Welfare Officer)" या पदाच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्यासाठी खालील चौकटीवर क्लिक ↵ करावे.

**"सहाय्यक कल्याण अधिकारी"(Assistant Welfare Officer)" या पदाच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी** ↵

६) "सहाय्यक कल्याण अधिकारी"(Assistant Welfare Officer)" या पदाची अंतिम निवड यादी ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेतील प्राप्त गुणांसह घोषित करण्यात येईल.

**(भि.य.मंता)**
कार्यकारी संचालक (मासं)

C:\Users\madhuri.Vengurlekar\Desktop\Notification-AWO.doc